**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज


RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले ● अंक ३१७ वा ● रविवार ०७ एप्रिल २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 317 | Date : 07/04/2024 blow Sunday Page 4 Price 4

## सोलापुरात तापमान किंचित घटले तरी उष्म्याची धग कायम



सोलापूर : काल गुरूवारी राज्यात सर्वाधिक ४१.१ अंश सेल्सियस तापमान सोलापुरात मोजले गेले असताना शुक्रवारी दुसऱ्या दिवशी त्यात किंचित घट होऊन ४२.४ अंशांपर्यंत तापमानाचा पारा खाली उतरला असला तरी उष्णतेची धग कायम आहे. सकाळपासूनच उष्म्याची तलखी जाणवत असून उष्माघात होऊन नये म्हणून नागरिकांकडून स्वतःहून उपाययोजना केल्या जात आहेत.

वाढत्या उष्म्यापासून बचाव करण्यासाठी आवश्यक कामांशिवाय घरातून बाहेर पडणे टाळले जात असून शासकीय-निमशासकीय कार्यालयांमध्ये कामांसाठी होणारी नागरिकांची वर्दळ बऱ्याच अंशी घटल्याचे दिसून येते. कार्यालयांमध्येही उष्म्याचा त्रास जाणवू नये म्हणून कूलर यंत्रांचा वापर वाढला आहे. बाजारपेठांमध्ये ग्राहकांची गर्दी सायंकाळनंतर होताना दिसून येते.

मुस्लीम बांधवांचा पवित्र रमजान महिना अंतिम टप्प्यात आला असून आतापर्यंत २६ रोजे पूर्ण झाले आहेत. निर्जल उपवास करताना लहान मुलांपासून ते वृध्दांपर्यंत नागरिकांनी रोजे केले आहेत. अंगाची काहिली होणा-या कडक उन्हाळ्यात १३ तासांपर्यंत अन्न आणि पाण्यावाचून रोजे करताना उपासकांची जणू कसोटी लागत आहे. वाढत्या कडक उन्हाळ्यातच । **पान २ वर**

# काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर मुस्लिम लीगची छाप; पंतप्रधान नरेंद्र मोदींचा हल्लाबोल

नवी दिल्लीः लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने ५ एप्रिल रोजी जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यात काँग्रेसकडून मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. या जाहीरनाम्यात अग्निवीर योजना बंद करून जुन्या पद्धतीने भरती राबविण्याचे आश्र्वासनासह तीस लाख युवकांना सरकारी नोकरी देण्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, काँग्रेसच्या या जाहीरनाम्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी टीका केली आहे. काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर मुस्लिम लीगची छाप आहे, असा हल्लाबोल पंतप्रधान मोदी यांनी केला. ते उत्तर प्रदेशमधील भाजपाच्या रॅलीला संबोधित करत होते. पहिली काँग्रेस आता राहिलेली नाही. लोकसभा



निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्यावर मुस्लिम लीगची छाप असल्याचे दिसून येते. तसेच जाहीरनाम्याचा काही भागावर डाव्या विचारसरणीचा प्रभाव दिसतो आहे. काँग्रेस ज्या उमेदवाराला तिकीट देते तो उमेदवार दुसऱ्या दिवशी काँग्रेस सोडत आहे. आज उरलेल्या काँग्रेसकडे राष्ट्रहिताची काहीच धोरणे नाहीत. देशाच्या विकासासाठी काही धोरणदेखील नाही, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

महात्मा गांधी यांच्यासह अनेक महान व्यक्ती काँग्रेसबरोबर जोडले गेले होते. मात्र, स्वातंत्र्य चळवळीच्या वेळी अस्तित्वात असलेली काँग्रेस दशकापूर्वीच । **पान २ वर**

## शिवसेनेच्या श्रीकांत शिंदेंची उमेदवारी फडणवीसांकडून जाहीर, भाजप नेत्यांचा विरोध २४ तासांच्या आत बासनात गुंडाळला

ठाणे : अखेर श्रीकांत शिंदे यांची उमेदवारी थेट देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केली. कल्याणची सुभेदारी भाजपला मिळणार की मुख्यमंत्री स्वतःकडे ठेवणार याबद्दल उठत असलेल्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे. मात्र थेट भाजपच्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेनेची उमेदवारी जाहीर केल्याने या ठिकाणी श्रीकांत शिंदे यांना असलेला भाजप नेत्यांचा आणि कार्यकर्त्यांचा विरोध मावळला आहे.कल्याण लोकसभा मतदारसंघात भाजपनेच उमेदवार द्यावा अशी मागणी पक्षाच्या कार्यकर्त्यांची होती. जर श्रीकांत शिंदे यांना उमेदवारी मिळाली तर भाजपचे कार्यकर्ते काम करणार नाहीत असा ठरावच त्यांनी मंजूर केला होता. या विरोधाला किनार होती ती मागील महिन्यात झालेल्या गणपत गायकवाड प्रकरणाची.



गणपत गायकवाड यांनी पोलीस स्टेशनमध्ये असताना श्रीकांत शिंदे यांचे निकटवर्तीय मानले जाणाऱ्या महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केला होता. त्यानंतर श्रीकांत शिंदे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात अनेक गंभीर आरोप केले होते. त्यामुळे श्रीकांत शिंदे यांच्या विरोधात भाजप कार्यकर्ते जाणार अशी चर्चा असतानाच खुद्द देवेंद्र फडणवीस यांनीच २४ तासांच्या आत सर्व विरोध शांत केला.

आतापर्यंत एकनाथ शिंदे यांनीच शिवसेनेच्या सर्व उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. मात्र कल्याणची जागा पहिल्या यादीत जाहीर न झाल्यामुळे अनेक प्रश्र्नचिन्ह निर्माण झाले होते. ठाण्याप्रमाणेच कल्याणची जागा भाजप स्वतःकडे मागत आहे का? कल्याणची जागा भाजपला देऊन ठाण्याची जागा स्वतःकडे ठेवण्यात येणार आहे का? कल्याणच्या जागेवर दुसराच उमेदवार असणार आहे का? अशा अनेक चर्चांना उधाण आले होते. मात्र श्रीकांत शिंदे इतके दिवस शांत होते. अखेर आज उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांनी आपले मौन सोडलं. भाजपच्या कार्यकर्त्यांनी विरोध दर्शवल्यानंतर शिंदे गटाकडून देखील । **पान २ वर**

## रमेश कदम सोलापूर लोकसभेसाठी फायनल?

### फारूक शाब्दि आणि रमेश कदम यांच्यात झाली बैठक

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात एम आय एम अखेर दंड थोपटणार असल्याचे निश्र्चित झाले आहे रमेश कदम आणि शहराध्यक्ष फारूक शाब्दि यांच्या या निवासस्थानी येथे शुक्रवारी रात्री गोपनीय बैठक झाली या गोपनीय बैठकीत एमआयएमचे सोलापुरातील प्रमुख नेते उपस्थित होते भाजपचे राम सातपुते व काँग्रेसचे प्रणिती शिंदे वंचिताचे राहुल गायकवाड यांच्या लढतीत एमआयएम उमेदवार देण्याच्या थांब भूमिकेवर असल्याचे समजते

एम आय एम चे जिल्हाध्यक्ष फारूक शाब्दि यांनी देखील माध्यमांना माहिती देताना सांगितले सोलापूर लोकसभा निवडणुकीत शंभर टक्के आम्ही उमेदवार देणार आहे मजबूत उमेदवार उमेदवाराची चाचणी सुरू असून लवकरच उमेदवाराचे अधिकृत



घोषणा करणार आहे रमेश कदम यांनी देखील या बैठकीत दोनोरा दिला असून माहिती देताना सांगितले की एम आय एम सी माझी चर्चा सुरू आहे सोलापूर लोकसभा निवडणुकीत मला एमआयएम ने उमेदवारी दिली तर विकासाच्या मुद्द्यावर अधिक लक्ष देणार आहे मागील त्याला पाणी आणि मागील त्याला रस्ता ही माझी संकल्पना असून याला राज्यभर व देशपातळीवर घेऊन जाणार अशी माहिती त्यांनी दिली मागील लोकसभा निवडणुकीत एम आय एम आणि वंचित ने युती करत जबरदस्त फाईट दिली होती प्रकाश आंबेडकर आणि जवळपास एक लाख ७० हजार मते प्राप्त करत निवडणुकीचा निकाल बदलून टाकला होता दलित आणि मुस्लिम मताचा विभाजन झाल्याने काँग्रेसचे उमेदवार सुशीलकुमार शिंदे यांचा पराभव झाला होता भाजपा जय सिद्धेश्र्वर महाराज महास्वामी यांचा एक लाख ५८ हजार मतांनी विजयी झाला होता

रमेश कदम यांना म्हणणारा मोहोळ विधानसभा मतदारसंघातील । **पान २ वर**

## शिवसेना शिंदे गटाचे नेते संजय कोकाटे यांचा राष्ट्रवादी शरदचंद्रजी पवार पक्षात प्रवेश



पंढरपूर/राजेंद्र कोरके पाटीलः शिवसेना शिंदे माढा संपर्कप्रमुख संजय कोकाटे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षांमध्ये शुक्रवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांसह जाहीर पक्ष प्रवेश केला. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थित मुंबई कार्यालय येथे त्यांचा पक्षप्रवेश प्रदेश कार्यालयामध्ये शिंदे शिवसेना गटाचे माढा संपर्कप्रमुख यांच्या हजारो कार्यकर्त्यांसह प्रदेश कार्यालयामध्ये पक्षप्रवेश विधानसभा शिवसेनेचे विधानसभेचे प्रमुख रामचंद्र टकले शिवसेना शिंदे गटाचे सोलापूर सुभाष पाटील आहेरगाव सरपंच जिल्हा उपप्रमुख विनोद पाटील संजय पाटील घाटणेकर अभिजीत पाटील बळीराम बळीराम काका साठे इत्यादी उपस्थित होते. पुढे जयंत पाटील म्हणाले की आमच्याकडे सर्वसामान्य कार्यकर्ते आहेत तर दुसऱ्या बाजूला सत्तारूढ पक्षाकडे कॉन्ट्रॅक्टर आहेत आमच्या पक्षात एखाद्या व्यक्तीने प्रवेश केला तर त्याच्या मागे तपासणी करण्याचा माध्यमातून कार्यवाही करण्यात येते.निवडणुका तर जाहीर झाल्या तपास यंत्रणेने आपला काम थांबवले पाहिजेत एखाद्या पक्षाला कार्यकर्त्याला उमेदवार म्हणून घर रिंगणात असेल तर त्या नेत्यास तुम्ही कार्यवाही करत आहात त्याचा अर्थ तुम्ही लोकशाही विरोधात आहात असा अर्थ देशातील जनता काढू लागली । **पान २ वर**

# सोलापूर शहराचा जलदगतीने विकास करण्यासाठी माझ्यासारख्या सामान्य शेतकरी कुटुंबातील व्यक्तीला निवडून द्या : राम सातपुते

## सोलापूर शहरातील व सम्राट चौक परिसरातील व्यापारी मेळाव्याला उस्फूर्त प्रतिसाद

सोलापूर/प्रतिनिधीः राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आनंद चंदनशिवे यांच्या पुढाकारातून महेश गार्डन, महेश नगर' सम्राट चौक या परिसरात ४२ सोलापूर लोकसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीचे व महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार रामभाऊ सातपुते हे सम्राट चौक परिसरातील व्यापारी परिसरातील नागरिक व व्यापारी यांच्या सदिच्छा भेटीसाठी सम्राट चौक परिसरातील व्यापारी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात ४२ सोलापूर लोकसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीचे व महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करून व्यापारी मेळावा कार्यक्रमास सुरुवात करण्यास आली.

यानंतर राम सातपुते यांना समस्त व्यापारी व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आनंद (दादा ) चंदनशिवे वतीने फेटा बांधून पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोगत ४२ सोलापूर लोकसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टी व महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार रामभाऊ सातपुते यांचा परिचय श्री. गौतमजी संचेती यांनी सर्व व्यापारी व नागरिकांना करून दिला. यावेळी



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते आनंद (दादा) चंदनशिवे मनोगत व्यक्त करताना म्हणाले सोलापूर शहरातील विविध प्रकारच्या उद्योगात कार्यरत असणारे प्रमुख व्यापारी सम्राट चौक परिसरात यांचा रहिवास आहे. सोलापूर शहरातील प्रमुख व्यापाराचा गाडा चालवणारे व्यापारी हे सम्राट चौक परिसरात राहतात. शहरातील तज्ज्ञ व्यक्ती म्हणजे डॉक्टर ते वकील पर्यंत सर्व प्रकारचे तज्ज्ञ ठिकाणी राहतात. तसेच इजराइलच्या ताकतीप्रमाणे सम्राट चौक भागात विविध प्रकारचे तज्ज्ञ व्यक्ति राहतात. अशाप्रकारे त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी नगरसेवक गणेशजी पुजारी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले आमदार रामभाऊ सातपुते हे माळशिरस विधानसभा मतदारसंघातून निवडून आले. यांच्या बाबतीत सांगायचे झालं तर ही अशी एक व्यक्ती आहे. चांगल्या कर्माची फळे चांगलीच असतात मुखातून गेलेला राम आणि निस्वार्थपणे केलेले काम कधीच व्यर्थ जात नाही. असे हे गोरगरीब कुटुंबातून आलेले व्यक्ती आणि त्यांचे कार्य हि त्यांच्या यशाची ठिकाणी पोचवतो . त्यांचे कष्ट आणि त्यांचे कर्तुत्व हे त्यांना खूप मोठ्या शिखरावर घेऊन जाणार आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की सोलापूरची दिशा बदलण्यासाठी व्यापारी हा खूप महत्त्वाचा असतो. आज या भागामधील व्यापाऱ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ताकद बळकट करण्यासाठी जो संकल्प केला.। **पान २ वर**

# संपादकीय

## हे त्यांच्या लक्षात आले नाही का?

मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर ईडीने केलेल्या कारवाईनंतर तिहार जेलमध्ये जाण्याची पाळी यावी, हे मोठे दुर्दैव म्हटले पाहिजे. लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजल्यानंतर केजरीवाल यांना अटक होऊन त्यांची रवानगी जेलमध्ये झाली. म्हणून इंडिया आघाडीतील पक्षांनी आदळ-आपट सुरू केली आहे. भाजपने विरोधकांना संपविण्याचे कारस्थान रचले आहे, असा टाहो काँग्रेसपासून सर्व भाजपविरोधी पक्ष फोडत आहेत. पण केजरीवाल हे ईडीने नऊ वेळा समन्स बजावूनही चौकशीला सामोरे गेले नाहीत, हे कोणी सांगत नाहीत. केजरीवाल हे मुख्यमंत्री आहेत म्हणून त्यांना कायदा उल्लंघन करण्याचे घटनेने चिलखत दिलेले नाही. दिल्लीच्या आम आदमी पक्षाच्या सरकारमधील तीन मंत्री अगोदरपासूनच जेलमध्ये आहेत. आता केजरीवाल यांची त्यात भर पडली आहे. ऐन निवडणुकीच्या रणधुमाळीत केजरीवाल यांना मोदी सरकारने जेलमध्ये पाठवले म्हणून त्यांना व त्यांच्या पक्षाला थोडी फार सहानुभूती मिळू शकेल, पण कायद्याच्या कचाट्यातून त्यांची सुटका कशी होऊ शकेल? दिल्ली सरकारने बनविलेल्या नवीन मद्य धोरणातून त्यांना व त्यांच्या पक्षाला जवळपास साडेतीनशे कोटी रुपये लाच म्हणून पैसे मिळाले, हा आरोप त्यांना न्यायालयात खोडून काढावा लागेल. केंद्रीय तपास यंत्रणांच्या चौकशीला महाराष्ट्रातले नेतेही सामोरे गेले होते. केजरीवाल यांना ईडीने नऊ वेळा समन्स बजावूनही ते चौकशीला गेले नाहीत. ईडीच्या विरोधात त्यांनी उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावत आपल्या अटकेच्या कारवाईवर स्थगिती द्यावी, अशी मागणी केली होती, आपण ईडीकडे चौकशीला जाण्यास तयार आहोत. पण त्यांनी आपल्याला अटक होणार नाही, असे आश्वासन द्यावे अशी केजरीवाल यांनी कोर्टाकडे मागणी केली होती. उच्च न्यायालयाने त्यांच्या मागण्या फेटाळून लावल्या आणि ईडीचे पथक त्यांच्या निवासस्थानी दरवाजात उभे राहिले. केजरीवाल हे निर्दोष आहेत की ईडीच्या म्हणण्याप्रमाणे मद्य घोटाळ्याचे प्रमुख सूत्रधार आहेत, हे न्यायालय ठरवेल. पण राज्याच्या मुख्यमंत्र्याला त्यांच्या घरी पोलीस आणि ईडीचे अधिकारी येऊन अटक करतात, यातून मुख्यमंत्रिपदाची बेईज्जती होते, हे त्यांच्या लक्षात आले नाही का?

# ईश्वराची शिकवण

जीवन जगत असताना आपण पाहतो,मानवाचे दैनंदिन कार्य सुरळीत व्हावे यासाठी ईश्र्वराने किती छान व्यवस्था करून ठेवली आहे.सर्व घटक हे आपापल्या कामात काहीच उणे ठेवत नाही.आयुष्यभर मोफत ऑक्सीजन देणारी झाडे,तहान भागवण्यासाठी नद्या आणि तलाव,सुंदरतेचे रुप फुले, जीवनात चव आणणारी फळे,प्रकाशित करणारा सूर्य,शीतलता देणारा चंद्र,जीवनात प्रसन्नता भरणारे विविध रंग, पशू आणि पक्षी हे सर्व निसर्गाने आपणास विनामूल्य सेवा देणारे बहाल केले आहे.

आज एक विचार करूया जर ईश्र्वराने रचना करताना कोणताही भेदभाव केला नाही तर माणसाने का करावा? ईश्र्वर निर्मित कोणताही घटक कधी भेदभाव करत नाही.संपूर्ण सृष्टी यथेच्छ ह्या निसर्गाचा उपभोग घेऊ शकते.मनुष्य जेंव्हा जन्मतो तेंव्हा तो कोणत्याही दूनियावी रचना धारण करून येत नाही आपण जन्मानंतर हे सर्व त्यावर लादतो.जगात केवळ एकच धर्म तो म्हणजे मानवता आणि दोनच जाती ती म्हणजे स्त्री व पुरुष.जरी बोलीभाषा वेगळी असेल परंतु प्रेमाची भाषा एकच असते.वेशभूषा जरी वेगळी असली तरी अंतरमन एकच.खानपान करी वेगळे असले तरी हवा सर्वांसाठी एकच.

जातीभेद,वर्णभेद आणि उच - नीच भाव मनात ठेऊन आजचा माणूस या सर्वांमध्ये विभाजन करत असताना आपण पाहतो.कुणी रंग वाटले तर कुणी पशू, प्रत्येकाचा धर्म वेगळा, चालीरीती वेगळ्या ,राहणीमान वेगळे तर बोलीभाषा वेगळी.एक विचार असायला हवा की निसर्गाने मानवाला हे प्रदान करताना कोणताही भेद केला नाही तर माणूस यात का अडकून पडला आहे किंबहुना बनवणाऱ्या ईश्र्वराने कोणतीही व्यवस्था विशिष्ट सामाजिक दृष्टिकोन समोर ठेऊन केलेली नाही कारण सर्व घटक हे सर्व मानवासाठी एकच आहे .सर्व काही विभागून माणूस एकमेकापासून दुरावत चालला आहे.आजचे वातावरण हे मानवी जीवनास घातक बनत चालले आहे.

काही काळापूर्वी एकमेकां बद्दल प्रेमभावना, आदरभाव, नम्रता, सहनशीलता,आपुलकी हे मनात अगदी प्रथम स्थानी होते परंतु आज ही सर्व भावना नष्ट होताना आपण पाहत आहोत.बातम्या पाहत असताना हृदय सुन्न होऊन जात कारण किती छोट्या छोट्या गोष्टी मुळे वाद होतात,जमिनीचे प्रकरण अगदी खून होण्यापर्यंत पोहोचते,मानसिक तणावातून वाद, बळाच्या जोरावर छळ होणे,लुटमार,गरिबांचे हक्क दाबणे हे सर्व वाढत आहे आणि ही विकृतपणाचे कारण केवळ माणसाच्या मनातून माणुसकी हरवत चालली आहे.आजच्या ह्या परिस्थितीत माणसाला स्थिर करण्यासाठी केवळ अध्यात्माचा आधार गरजेचा आहे.ईश्र्वराची अनमोल रचना असलेला मानव आज नको त्या मार्गाला लागून जन्म वाया घालत आहे.स्वतः च्या शक्तीचा गर्व करताना तो हे विसरून जातो की ज्याच्या बळावर हा देह चालतो तो किती बलशाली असेल.ज्याच्या सामर्थ्याने श्रुष्टी फुलेलेली आहे त्या परमपित्या परमात्माची व्याप्ती अफाट आहे.असा हा परमात्मा प्राप्त केल्यानंतर साहजिक मनातील सर्व वाईट विकारांना नष्ट करणे शक्य होईल.ज्या परमात्म्याचे वर्णन करता चार वेद, अठरा पुराण आणी करोडो वाणी कमी पडेल असा ईश्र्वर भेटला की आपोआप जीव ह्याचे गुणगान करण्यात रमून जातो. मग प्रश्र्न पडतो हा परमात्मा कोण दाखवू शकतो? जगाच्या पाठीवर ईश्र्वर आहे हे म्हणणारे भरपूर भेटतील परंतु ह्याची प्रचिती करून देऊन सर्व शंका दूर करणारा ज्यांच्या परम कृपेने ईश्र्वर प्राप्तीचा मार्ग मिळतो व मनुष्य जन्म भवसागर पार होतो.ज्ञानाचा प्रकाश पडला की जीवनातून सर्वच मतभेद निघून जातात आणी समोर दिसतो केवळ एक परमात्मा आणी त्याची सुंदर निर्मिती.सत्याचा संग करताना मृगजळ असणारी माया नजरेतून दूर होऊन हे विश्र्व प्रभुमय दिसू लागते आणी हा देह गर्व अभिमान त्यागून संतांच्या पायी नतमस्तक होतो.प्रभुच्या सर्व लेकरांना बंधुभावाचा तो निर्विकार नजारा पहावयास मिळतो ज्याची कधी कल्पना सुद्धा करता येणार नाही.

ईश्र्वराच्या या संपूर्ण रचनेतून एकच शिकवण घेऊया
एका ईश्र्वराची सर्व लेकरे आपण एक होऊया.

**पवन श्रीरंगसा कुसुंदल ,नांदेड**
**संपर्क:९०७५५९५६९५**

पान १ वरुन

## काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर मुस्लिम..

संपली आहे. आता जी काँग्रेस राहिली, त्यांच्याकडे देशाच्या हितासाठी काहीही नाही. काँग्रेसने कधीही वंचित, शोषितांचा विचार केला नाही, असा हल्लाबोल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज उत्तर प्रदेशमच्या सहारनपूर येथे भव्य रॅली पार पडली. यावेळी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, काँग्रेसने बालेकिल्ला म्हणून मानलेल्या अमेठी आणि रायबरेली या मतदारसंघातदेखील काँग्रेस उमेदवार उभे करण्याचे धाडस दाखवू शकत नाही, असा टोला पंतप्रधान मोदी काँग्रेसला लगावला. काँग्रेसने जाहीरनाम्यात तीस लाख युवकांना सरकारी नोकरी, आरक्षणाची मर्यादा वाढवविण्याचे आश्र्वासन, गरीब महिलांना वर्षाला १ लाख रुपये देण्याचे आश्र्वासन, शेतकऱ्यांच्या सर्व गोष्टींवरील जीएसटी हटविण्याचे आश्र्वासन, अग्निवीर योजना बंद करून जुन्या पद्धतीने भरती राबविण्याचे आश्र्वासन तसेच गॅस सिलिंडरच्या दरात कपात करण्याच्या आश्र्वासनासह आदी मोठ्या घोषणा काँग्रेसने केल्या आहेत.

## सोलापुरात तापमान किंचित

जिल्ह्याच्या ग्रामीण भागात दुष्काळाचे संकट अधिक गहिरे होत असून सध्या ३८ गावांना ४२ टँकरद्वारे पिण्यासाठी पाणीपुरवठा केला जात आहे. परंतु शासनाच्या मालकीचे १६ टँकर असताना त्यापैकी १२ टँकरसाठी चालकच उपलब्ध नाहीत, अशी माहितीही समोर आली आहे. यासंदर्भात पुणे विभागीय महसूल आयुक्त डॉ. चंद्रकांत पलगुंडवार यांनी सोलापुरात घेतल्या आढावी बैठकीत टँकरचालक तात्काळ उपलब्ध करण्याचे आदेश देण्यात आले. बार्शी, माळशिरस आणि सांगोला या तीन तालुक्यांमध्ये दुष्काळाची स्थिती गंभीर असून करमाळा व माढा तालुक्यात दुष्काळाची स्थिती मध्यम स्वरूपाची आहे. इतर ५५ महसुली मंडलांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

## शिवसेनेच्या श्रीकांत शिंदेंची उमेदवारी

या संदर्भात महत्त्वाच्या नेत्यांच्या प्रतिक्रिया आल्या. महायुतीचा धर्म सर्वच पक्षांनी पाळायला हवा आणि जरी काही विरोध असेल तरी तो त्या पक्षाचे वरिष्ठ नेते दूर करतील असा विश्र्वास शिंदे गटाच्या नेत्यांनी व्यक्त केला.

कल्याण लोकसभा मतदारसंघ हा ठाणे महानगरपालिकेतील कळवा, मुंब्रा, दिवा या भागापासून सुरू होतो ते थेट कल्याण डोंबिवली महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिकापासून अंबरनाथपर्यंत थांबतो. यामध्ये राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जितेंद्र आव्हाड, मनसेचे राजू पाटील, भाजपाचे रवींद्र चव्हाण, गणपत गायकवाड आणि कुमार आयलानी, शिवसेना शिंदे गटाचे बालाजी किणीकर हे आमदार आहेत. भाजपचे तीन आमदार इथे असल्याने आणि स्थानिक स्वराज्य संस्थेत देखील भाजपचं वर्चस्व आहे. त्यामुळे ही जागा भाजपला मिळावी यासाठी भाजपकडून प्रयत्न करण्यात येत होते. मधल्या काळात केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी कल्याण लोकसभा मतदारसंघात अनेक बैठका घेतल्या. त्यामुळेच कल्याणमधून भाजपचे मंत्री रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी मिळणार चर्चा सुरू होती. आता मात्र खुद्द देवेंद्र फडणवीस यांनीच आज श्रीकांत शिंदे यांचे नाव जाहीर केल्यामुळे सर्व चर्चा संपल्या आहेत. भाजपच्या सर्व नेत्यांनी देखील श्रीकांत शिंदे यांनाच पाठिंबा जाहीर केला आहे.

मधल्या काळात मनसेचे आमदार राजू पाटील यांनी सोशल मीडियावरून श्रीकांत शिंदे यांच्याविरोधात अनेक वेळेस टीका केल्याने मनसेकडून राजू पाटील देखील लोकसभेच्या रिंगणात उतरणार अशी चर्चा होती. मात्र याही चर्चेला आता पूर्णविराम मिळाल्याने श्रीकांत शिंदे विरोधात महाविकास आघाडीच्या वैशाली दरेकर यांची लढत होणार हे निश्र्चित मानले जात आहे.

उद्धव ठाकरे यांनी आपल्या लोकसभा मतदारसंघाच्या दौऱ्याला कल्याण लोकसभा मतदारसंघातूनच सुरुवात केली होती. त्यामुळे या ठिकाणी ठाकरे गटाकडून बलाढ्य उमेदवार दिला जाणार ही शक्यता होती. मात्र सुषमा अंधारे, वरुण सरदेसाई आणि केदार दिघे या तिघांनी देखील असमर्थता दाखवल्याची सूत्रांची माहिती आहे. त्यामुळेच अखेर ही माळ वैशाली दरेकर यांच्या गळ्यात पडली आहे. आता ही लढत चुरशीची होणार की एकतर्फी होणार हे येणाऱ्या दोन महिन्यात स्पष्ट होईल.

## रमेश कदम सोलापूर लोकसभेसाठी

मोठा युवा वर्ग आहे मला सोलापूर मध्य विधानसभा मतदारसंघात मांडणारा मोठा वर्ग आहे रमेश कदम यांच्या मागील त्याला पाणी मागेल त्याला रस्ता या संकल्पनेतून सोलापुरात मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला होता हीच संकल्पना पुन्हा एकदा सोलापूर लोकसभेच्या निवडणुकीच्या प्रचारात पुन्हा एकदा ऐकायला मिळेल

## शिवसेना शिंदे गटाचे नेते संजय

आहेत जयंत पाटील यांनी म्हटले आहे

संजय पाटील म्हणाले की भाजपला चारशे खासदार निवडून आणायचे आहेत ते याकरिता की डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधान बदलण्याकरिता यांना खासदार निवडून आणायचे आहेत या देशातील घटना बदलून सर्व अधिकार आपल्याकडे आणण्यासाठी हा प्रयत्न सुरू आहे देशांमध्ये लोकशाही टिकवण्यासाठी का नाही या दृष्टीने ही लोकसभा निवडणूक अतिशय महत्त्वाची आहे हे सर्व तुम्हा आम्हाला ठरवायचं आहे असे जयंत पाटील म्हणाले

जयंत पाटील म्हणाले की संजू भाऊ कोकाटे तुम्ही योग्य पाऊल टाकलेले आहे राष्ट्रवादी काँग्रेस शरचंदरी पवार पक्षात मी तुमचं स्वागत करतो माझ्यामध्ये पक्ष संघटना बळकट केली तर तिथे तुमच्या शिवाय दुसरा कोणी नाही पक्ष संघटना भूत पर्यंत अधिकार आपल्याकडे आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत तुम्ही सर्वांनी मिळून ताकतीने काम करा अशी जैन पाटील म्हणाली पक्षप्रवेश करताना मार्ग क्षणा करताना मार्गदर्शन करताना जयंत पाटील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष मधल्या काळामध्ये संकटात होता तिकडल्या अनुभव लोकांना येत असल्यामुळे आता पक्षांमध्ये लोक आता मिळवून घेत आहे जुळवून घेत आहेत असे जयंत पाटील म्हणाले. जयंत पाटील म्हणाले महाराष्ट्रातील सामान्य माणसाला राज्यातील जी परिस्थिती आहे या संदर्भात प्रचंड राग आणि संतोष सामान्य माणसांमध्ये आहे अशा प्रकारे मला टिकवण्याचे सुरू आहे हे आपण आज बघा आहे असे सत्तेत घेतलेल्या गैरवापर करून दबाव टाकून पक्षात घेण्याचे काम सुरू आहे १९ मधील निवडणुकीमध्ये देखील असे सुरू होते त्यावेळेस देखील मी सांगितले होते की त्यांना जर तिकडे जायचं असेल तिकडे परिस्थिती चांगली आहे या निवडणुकीमध्ये महागाईला कंटाळलेले जनतेचे बेरोजगार असलेल्या युवकांनी शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव नाही हे सर्व कधी निवडणूक लागली यांची वाट बघत होते असे जयंत पाटील म्हणाले

## सोलापूर शहराचा जलदगतीने विकास

तो खूप महत्त्वाचा आहे. या व्यापाऱ्यांच्या दिशेवरून समजतं की येणाऱ्या लोकसभेमध्ये आपला विजय हा निश्र्चित आहे. याप्रकारे त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

भारतीय जनता पार्टीचे शहर अध्यक्ष नरेंद्रजी काळे यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना म्हणाले की आपल्या देशाला ज्या उंचीवर मोदीजींनी नेले ती अधिक बळकट करण्यासाठी १० वर्षात मोदीजींनी केलेले काम हे सातत्याने लक्षात ठेवावे. हे समोर ठेवावे आणि आपल्या शहराचा विकास करायचा असेल तर रामभाऊ सातपुते यांना विजयी करा. खऱ्या अर्थाने म्हणजे एक व्हिजन असणारा युवा नेता आपल्याला मिळाला आहे. पुढच्या ५ वर्षात ठरवून एका उंचीवर न्यायचं आणि एक रोल मॉडेल म्हणून आपल्या शहराचा विकास करायचा असेल तर रामभाऊंच्या मागे सगळ्यांनी उभे राहावं व त्यांना आपला आशीर्वाद द्यावा ही विनंती. अशाप्रकारे त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी ४२ सोलापूर लोकसभा मतदारसंघातील मतदारसंघातील जनता पार्टी व महायुतीचे अधिकृत उमेदवार मा. आमदार रामभाऊ सातपुते यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की ही निवडणूक देशाची आहे. खऱ्या अर्थाने मोदीजींनी २०१४ साली या देशांमध्ये ना भूतो ना भविष्यती अशा पद्धतीचे परिवर्तन केले. पुढची ५० वर्ष हा देश कसा असला पाहिजे हे व्हीजन मोदीजींनी मनामध्ये ठेवून जिद्दीने कामाला सुरुवात केली. हा देश एकेकाळी चायनाचे मोबाईल वापरत होता प्रत्येकाच्या हातामध्ये मेड इन चायना मोबाईल असायचे. हा देश मोदीजींनी इतका स्ट्राँग बनवला. की या ठिकाणी जगामध्ये भारत हा मोबाईल मॅन्युफॅक्चरिंग जगात दोन नंबरचा देश आहे.मोदीजींनी सोलापूरला ४० हजार कोटींचे रस्ते दिले. पंतप्रधान स्वनिधी या योजनेतून मोदीजींनी अनेक गरजवंतांना मदत केली. या सोलापूर लोकसभेच्या अंतर्गत या ठिकाणी हजारो शेतकऱ्यांना मोदीजी वर्षाला ६००० हजार रुपये देण्याचे काम करतात. हे मोदीजींनी केलं त्यामुळे या शहराची इन्फास्ट्रक्चर डेव्हलपमेंट झाली. स्मार्ट सिटीच्या माध्यमातून आपण व्यापारी पिढ्यानपिढ्या व्यापार करता. सोलापूरचा पाण्याचा प्रश्र्न होता तो मोदीजींनी अमृत भारत योजनेअंतर्गत ६५० रु कोटींची योजना ती अंतिम टप्प्यात आहे आणि पुढच्या चार महिन्यांमध्ये या समांतर जलवाहिनीचे काम पूर्ण होईल आणि सोलापूरकरांचा कायमचा पाण्याचा प्रश्र्न मिटेल. अशाप्रकारे त्यांनी पंतप्रधान मोदीजींना तिसऱ्यांदा पंतप्रधान होण्यासाठी मला सोलापुरातील जनतेने लोकसभेत सदस्य म्हणून निवडून द्यावे असे उद्गारले केले. यावेळी लोकसभेचे उमेदवार मा. राम (भाऊ) सातपुते, भा.ज.पा. शहराध्यक्ष नरेंद्र काळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आनंद (दादा) चंदनशिवे, नगरसेवक गणेशजी पुजारी, अँड. विजयजी मराठे, उद्योजक श्री इंद्रमलजी जैन, गुड्डूजी शर्मा, निलेशजी भंडारी, शितलजी सोनी, जुगलजी करवा, रामवल्लभजी जाजू, कैलासजी कोठारी, रंगनाथजी बंग, चंद्रकांतजी तापडिया, श्रीनिवासजी दायमा, प्रभूराज मैंदर्गी, मोहनजी सचदेव, नित्यानंद दरबी, हर्षलजी कोठारी, अनिल छाजेड ,पुरुषोत्तमजी धूत, ब्रिजमोहनजी फोफलिया, प्रवीणजी भुतडा, मंगलजी दायमा, प्रमोद दरगड, लक्ष्मीकांत मानधनिया , कल्पेश मालू,रजनी भाभी शर्मा, तुकारामजी गायकवाड, केतन ओरा, दीपकजी मुनोत, गुड्डू शर्मा, गौतमजी वेद, धर्मेश राडिया, विशाल वर्मा ,पवन काबरा, विकास सिंघवी ,अशोक जैन,कल्पेश मालू ,रमेश बंब, गिरीष गांधी, धन्यकुमार खाबे, वसंत मुनोत, सुनील तोष्णीवाल, विजय खंडेलवाल, संजय खंडेलवाल, मनीष मणियार, किशोर वेद, धीरज झवर, मनीष पंचारिया, अभय सुराणा श्यामसुंदर दरगड, सुरज धूत ,अशोक वेद अशोक बाहेती ,जयचंद वेद, नरेश उपाध्ये, निलेश भंडारी ,अनिल जैन ,किशोर वेद इत्यादी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी झ इ ग्रुपचे प्रमुख गौतम महाराज चंदनशिवे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर प्रवक्ते सुहास सावंत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर उपाध्यक्ष अविनाश भडकुंबे , सचिव चंद्रकांत सोनवणे, संघटक मनोज थोरात , इत्यादी उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौतमजी संचेती व आभार प्रदर्शन शितल सोनी यांनी केले

# ज्ञानदीप शिक्षण समूहामध्ये मोफत शिवण क्लास व कॉम्प्युटर एज्युकेशन सेमिनार मोठ्या उत्साहात संपन्न




दर्शनाळ/देविदास माने : ज्ञानदीप शिक्षण समूहाच्या ज्ञानदीप शिवण क्लास वसंत विहार सोलापूर व ज्ञानदीप कॉम्प्युटर एज्युकेशन वसंत विहार सोलापूर च्या वतीने महिलांसाठी सेमिनार स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी महासंघाच्या सोलापूर महिला जिल्हा अध्यक्ष प्रा डॉ. भाग्यश्री राठोड, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला शिक्षण व प्रशिक्षण केंद्र महाराष्ट्र राज्य सचिव मीनाक्षी जाधव, ॲक्टर मोनाली पागे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाला सदर सेमिनारला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. ज्ञानदीप शिक्षण समूहाच्या वतीने महिलांना मोफत शिवण क्लास,मोफत बेसिक कॉम्प्युटर कोर्स देणारी महाराष्ट्रातील पहिली शैक्षणिक संस्था आहे या संकुलामध्ये ज्ञानदीप पॅरामेडिकल कॉलेज, ज्ञानदीप अंगणवाडी प्रशिक्षण केंद्र,ज्ञानदीप पब्लिक स्कूल, ज्ञानदीप कॉम्प्युटर एज्युकेशन या माध्यमातून विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात शिक्षण दिले जाते आणि पालकांबरोबर विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून ज्ञानदीप बुक डेपो सोलापूर या नावाने याच संकुलाचा बुक डेपो सुरू करण्यात आलेला आहे

सदर कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानदीप पब्लिक स्कूल सोलापूरच्या आदर्श व कर्तव्यदक्ष प्राचार्या अमृता शिंदे यांनी केले तर सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख शीमा भोसले यांनी केले तर सर्वांचे आभार मानसी इंगोले यांनी मानले यावेळी ज्ञानदीप शिक्षण समूहातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# अक्कलकोट शहराचे नगरसेवक पै.सद्दाम शेरीकर मित्रपरिवार तर्फे दावत ए इफ्तार' पार्टी आयोजन



अक्कलकोट/प्रतिनिधी :अक्कलकोट शहराचे नगरसेवक तथा बांधकाम सभापती पै. सद्दाम शेरीकर मित्रपरिवार तर्फे दावत ए इफ्तार' पार्टी करण्यात आले अक्कलकोट शहराचे माजी नगरसेवक पै.सद्दाम शेरीकर मित्रपरिवार तर्फे पवित्र रमजान महिन्याचे औचित्य साधून सर्व मुस्लिम बांधावासाठी ' दावत ए इफ्तार'चे आयोजन आरीफ शेरीकर चौक, मक्का मस्जिद अक्कलकोट येथे करण्यात आले होते.

माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे , गृहराज्यमंत्री सिद्धारामजी म्हेत्रे, श्री स्वामी समर्थ अन्नक्षत्रचे विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत ' दावत ए इफ्तार' पार्टी संपन्न झाली. सर्व धर्मसमभावाचे दर्शन या इफ्तार पार्टी मध्ये दिसले. माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी सर्व मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.या इफ्तार पार्टी मध्ये अक्कलकोट शहर व परिसरातील नागरिक सहभागी झाले होते.या वेळी सर्व मुस्लिम बांधवांचे स्वागत करताना पै.सद्दाम शेरीकर, माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे,माझी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे ,चेतन नरोटे, अक्कलकोट उत्तर पोलिस राजेंद्र टाकणे ,श्री स्वामी समर्थ अन्नक्षत्रचे विश्र्वस्त अमोलराजे भोसले,वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे,हजरत मस्तुर शाह कादरी, अविनाश मडिखांबे, रईस टिनवाला, रजाक सय्यद,अशपाक बळोरगी,शाकीर पटेल, वसंत देडे, पत्रकार अल्ताफ पटेल,अकील बागवान,रुद्र स्वामी,मुबारक कोरबु,फारूक बबर्ची,व मान्यवर पदाधिकारी व एस एस सोशल ग्रुप चे सर्व कार्यकर्ते व मुस्लीम बांधव उपस्थित होते.सद्दाम शेरीकर व एस एस सोशल ग्रुप मित्रपरिवार यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# इंटरनेट या प्लॅटफॉर्मचा उपयोग संशोधनासाठी करणे आवश्यक : जेष्ठ पत्रकार डॉ.निरगुडकर



**'समृद्ध भारताच्या निर्मितीसाठी व विकसित भारतासाठी स्वेरी उत्तम कार्य करत आहे असे असताना विद्यार्थ्यांना अद्ययावत माहितीची आवशकता आहे. असे असल्यास अमेरिकेतील विद्यार्थी स्वेरीमध्ये ॲडमिशन घेण्यासाठी रांगा लावतील.' या पत्रकार डॉ.निरगुडकर यांच्या विधानावर स्वेरीचे डॉ. खेडकर म्हणाले की, 'स्टडी ऑफ सोलार डिप्लॉयमेंट इन पंढरपूर' या विषयावर संशोधन करण्यासाठी वर्जीनिया (वॉशिंग्टन, अमेरिका) येथून 'नेहरू फुलब्राईट यु.एस. स्टुडंट रिसर्च प्रोग्राम' च्या माध्यमातून झंकरी मरहंका हे विद्यार्थी एक वर्षापूर्वीच स्वेरीत संशोधन करीत असल्याचे स्पष्ट केले.**

पंढरपूर/प्रतिनिधीः 'देशाला मोठे करायचे असेल तर सर्वप्रथम देशातील प्रत्येक नागरिक मोठा झाला पाहिजे. नागरिकच समाजाला मोठे करतो. त्यामुळे साहजिकच देश मोठा होतो. हिरोशिमा व नागासाकीवर झालेल्या अणुबॉंब हल्ल्यानंतर 'जपान' खचून न जाता पुढे आर्थिक दृष्ट्या संपन्न झाला. हल्ल्यानंतर जपान हा देश सर्व आघाड्यांवर रसातळाला गेला होता. जपानमध्ये गेल्यानंतर जाणवले की, तेथील नागरिक हे कमालीचे देशभक्त आहेत. जपानी जीवन पद्धतीत 'साहस' ही बाब मूलभूत आहे. आपला देश साहसापासून वंचित राहतो. वैचारिक जीवन जगताना आपण स्वार्थी बनतो. त्या ठिकाणी प्रथम देश, नंतर व्यक्ती हे अंगभूत धोरण आहे. कारण जपानमध्ये तेथील नागरिक एका ध्येयाने प्रेरित होऊन कार्य करतात.जपानच्या नागरिकांमध्ये राष्ट्रभक्तीचे संस्कार पूर्णपणे रुजलेले आहेत. आपण मानसिक गुलामगिरी झुगारून पुढे आले पाहिजे. जपान आणि भारताचा विचार केल्यास भारतातील नागरिकांनी स्मार्ट युगात उपलब्ध असलेल्या इंटरनेट या प्लॅटफॉर्मचा उपयोग संशोधनासाठी करणे आवश्यक आहे.' असे प्रतिपादन जेष्ठ पत्रकार व विचारवंत डॉ. उदय निरगुडकर यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये भारत देश हा २०४७ साली कसा असेल याबाबत आयोजिलेल्या 'भारत २०४७' या विषयावर ज्येष्ठ पत्रकार व विचारवंत डॉ.उदय निरगुडकर हे मार्गदर्शन करत होते. डॉ.निरगुडकर यांनी संदेश फलकावरून विद्यार्थ्यांना 'विकसित भारत के लिये कर्ता बनिये' असा संदेश दिला. महाराष्ट्र गीत व स्वेरी गीतानंतर प्रास्ताविकात स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे म्हणाले की, 'कंपनीमध्ये मोठ्या हुद्द्यावर असताना ज्यांनी आत्मविश्र्वासाने क्षेत्र बदलले आणि झी २४ तास या न्युज चॅनेल मधील 'रोखठोक'च्या माध्यमातून जबाबदार नेत्यांना, उद्योगपतींना, समाजसेवकांना व कार्यकर्त्यांना आपल्या वाणीने व प्रश्र्नांनी त्यांनी या सर्वांना जबरदस्त झुंजवले तसेच त्यांना जबाबदारीची जाणीव करून देण्याचे कार्य डॉ. निरगुडकर साहेबांनी केले. मोठ्या कंपनीपासून टीव्हीकडे त्यांनी आत्मविश्र्वासाने प्रवास करत असताना व सामाजिक बांधिलकी जोपासताना 'भारत २०४७' च्या माध्यमातून राज्यातील विद्यार्थ्यांना आपली भूमिका नेमकी काय असावी? हे स्पष्ट करत जनजागृती करत आहेत' असे सांगितले. महाराष्ट्र नॉलेज सेंटरचे समन्वयक स्वप्निल चौधरी यांनी 'महाराष्ट्र नॉलेज सेंटर' या संस्थेची वाटचाल, कार्य, स्वरूप व त्याची व्याप्ती सांगून राज्यातील चांगल्या बाजू ह्या भारत देशात सर्वदूर पोहोचवण्यासाठी ही संस्था कार्य करत असल्याचे सांगून 'भारत २०४७' या उपक्रमाची माहिती दिली. पुढे डॉ.निरगुडकर म्हणाले की, 'विद्यार्थ्यांनी फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाटस् अप, ट्वीटर अशा विविध सोशल मीडियाच्या मागे जास्त लागू नये. जे नको आहे ते सर्व माध्यमातून पसरवले जात आहे.

'गल्लीत तर विचारत नाही कुत्रं, आणि फेसबुकवर सतराशे साठ मित्र' अशी आजच्या तरुणांची अवस्था आहे. त्यामुळे भविष्यकाळ अवघड आहे. जोपर्यंत 'मला केवळ पक्षी बनायचे नाही तर लाखो पक्षी आपल्या कवेत घेणारे आकाश बनायचे आहे' अशी दूरदृष्टी तरुणांमध्ये निर्माण होत नाही तोपर्यंत सुधारणा होणार नाही. आपल्या विचारातून ज्ञानगंगा निर्माण झाली पाहिजे. संपत्ती ही लुटता येते पण ज्ञानाची शिदोरी लुटता येत नाही. जीवनामध्ये त्रस्त, सुस्त, व्यस्त व मस्त अशा प्रकारची माणसे आढळतात. अभ्यासातून सर्वप्रथम आपले ध्येय समजून घेणे, त्यात आवड निर्माण करणे आणि त्यातून संशोधन करणे हे महत्त्वाचे आहे. आजचे शिक्षण आणि पाच वर्षांनंतरचे शिक्षण यात खूप मोठे फरक जाणवणार आहेत. असे सांगून त्यांनी इतिहास, अर्थशास्त्र, भूगोल, राज्यशास्त्र, अमेरिका, बंगालचा १९४० चा दुष्काळ, कोरोना कालावधीतील महिलांचे कार्य अशा विविध विषयांना स्पर्श केला. एकूणच स्वेरीतील विद्यार्थ्यांना ज्ञान कौशल्य वाढविण्याच्या हेतूने त्यांनी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी अनेक प्रश्र्न विचारले असता डॉ. निरगुडकर यांनी त्यांची समाधानकारक उत्तरे दिली. यावेळी महाराष्ट्र नॉलेज सेंटरचे समन्वयक अभिजीत पाटील, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, विश्र्वस्त एच. एम. बागल, विश्र्वस्त बी.डी. रोंगे, युवा विश्र्वस्त प्रा.सुरज रोंगे, स्वेरी कॅम्पसचे इन्चार्ज डॉ.एम. एम. पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या चारही महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, फार्मसीच्या विद्यार्थी प्रतिनिधी पूजा बत्तुल, अभियांत्रिकी व फार्मसीच्या चारही महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रम विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले तर विद्यार्थी संसद मंडळाच्या सचिवा राजनंदिनी पाटील यांनी आभार मानले.

# माढा लोकसभा मतदारसंघात खरी लढत हि वंचित विरोध राष्ट्रीय कॉंग्रेस अशी होईल : रमेश बारसकर



करमाळा/ प्रतिनिधी : माढा लोकसभा मतदारसंघात खरी लढत हि वंचित बहुजन आघाडी विरुद्ध राष्ट्रवादी कॉंग्रेस अशी ेईल कारण भाजपचे निंबाळकर हे पाच वर्षांत दिसले नाही व आता ते जनतेला आश्र्वासन देत सुटले आहेत यावेळी बारसकर म्हणाले की मला करमाळ्यातील जनतेने निवडून दिले तर पहिल्यांदा रिटेवाडी उपशा सिंचन योजना मार्गी लावले तसेच जातेगाव ते टेंभुर्णी महामार्ग यांचे काम मार्गी लावले करमाळ्याती एम आय डी सीचा हि प्रसन्न मार्गी लावले असं आश्र्वासन बारसकर यांनी दिली या पत्रकार परिषदेला माढा लोकसभा विभागांचे जेष्ठ जिल्हा उपाध्यक्ष सुभाष ओव्हाळ युवा जिल्हा अध्यक्ष साहेबराव वाघमारे जि सं जालिंदर गायकवाड जि सं विलास कांबळे ता अध्यक्ष नवनाथ साळवे शहर अध्यक्ष विशाल लोंढे ता उपाध्यक्ष अजय पवळ ता सचिव नंदकुमार कांबळे युवा ता अध्यक्ष जनार्दन उबाळे युवा शहर अध्यक्ष गणेश कांबळे समता परिषदेचे अध्यक्ष शिवाजी बनकर शेतकरी संघटनेचे आण्णासाहेब सुपनवर महावीर पोळ सचिन घोडके लक्ष्मण भालेराव संतोष पोळ सचिन घोडके संभाजी कांबळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

# आशिष वाघमारे यांचे सुयश

वागदरी/प्रतिनिधी : वागदरी ता.तुळजापूर येथील मुळ रहिवाशी असलेले आणि सध्या मुंबई येते वास्तव्यास असलेले सुनिल भिमा वाघमारे यांचे चिरंजीव आशिष सुनिल वाघमारे यांनी मुंबई विद्यापिठातून इलेक्ट्रॉनिक इंजनिअर या क्षेत्रातील पदवी संपादन करून घवघवीत यश संपादन केले आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई येथे छोट्याशा घरात राहून फुटपाथ वर भाजी विक्रीचा धंदा करतकरत प्रतिकुल परिस्थितीवर मात करून उच्च माध्यमिक शिक्षण पुर्ण करून मुंबई महानगरपालिकेच्या आखत्यारित असलेली बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम यामध्ये सुरूवातीला वाहक म्हणून सेवा करून सध्या बस प्रवर्तक म्हणून कार्यरत असलेले वागदरी ता.तुळजापूर गावचे सुपुत्र सुनील भीमा वाघमारे यांचे चिरंजीव



कुमार आशिष सुनील वाघमारे यांनी मुंबई युनिव्हर्सिटी मधून इलेक्ट्रॉनिक इंजिनिअर या क्षेत्रातील पदवी संपादन केली असून नुकतच मुंबई विद्यापिठाने आयोजीत केलेल्या पदवीदान समारंभात त्याना सदर पदवी प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले. त्यानी मिळविलेल्या याशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे

# जिल्ह्यात टंचाई उपाय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी : विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्ह्यात पाणी व चारा टंचाई भासणार नाही यासाठी प्रशासनाने टंचाईच्या उपाय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. तसेच जिल्ह्याचा टंचाई कृती आराखडा माहे जून २०२४ अखेर पर्यंत करावा, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित जिल्ह्याच्या टंचाई आढावा बैठकीत विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सहआयुक्त पूनम मेहता, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर दामा यांच्यासह अन्य विभागप्रमुख उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार पुढे म्हणाले की राज्य शासनाने टंचाई जाहीर केलेल्या तालुक्यांमध्ये विविध सवलती जाहीर केलेल्या आहेत त्याची अंमलबजावणी होत आहे की नाही याची संबंधित यंत्रणांनी खात्री करावी. टंचाई सदृश्य गावात चारा व पाणी उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासनाने सूक्ष्म नियोजन करावे. पाणीपुरवठा योजनेसाठी विशेष दुरुस्ती प्रस्ताव सादर करत असताना ही कामे तात्काळ पूर्ण करून घ्यावीत. तसेच कामांचा दर्जा उत्कृष्ट असेल याची खात्री करावी. जिल्ह्यात असलेल्या १६ शासकीय टॅंकर पैकी १२ टॅंकरला वाहनचालक उपलब्ध नसल्याचे दिसून येत आहे तरी या शासकीय टॅंकर साठी मानधन तत्वावर अथवा शासनाने विहित केलेल्या पद्धतीनुसार वाहन चालक उपलब्ध करून घ्यावेत, असे ही डॉ. पुलकुंडवार यांनी सूचित केले. तसेच टंचाईच्या कामात कोणीही हलगर्जीपणा करू नये असेही त्यांनी निर्देशित केले.

जिल्ह्यात यावर्षी पावसाचे प्रमाण कमी झाल्याने जिल्ह्यात टंचाई सदृश परिस्थिती आहे. उजनी धरणात वजा ३७.०९% पाणीसाठा उपलब्ध आहे. प्रशासनाने जून २०२४ अखेरपर्यंत पाणी उपलब्ध करण्यासाठी सूक्ष्म नियोजन केलेले आहे. सद्यस्थितीत पिण्याचे पाणी उपलब्ध करण्यासाठी प्रशासन प्रयत्न करत आहे. जिल्हा नियोजन समितीमध्ये चार कोटी पन्नास लाख रुपयांचे चारा बियाणे खरेदी करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाला उपलब्ध करून दिलेले असून यातून बियाणे खरेदी करून ज्वारी, बाजरा व मका चारा उपलब्ध होत असून जुलै २०२४ अखेरपर्यंत जिल्ह्यात चारा उपलब्ध राहणार आहे. तसेच जिल्हा बाहेर चारा घेऊन जाण्यास बंदी घालण्यात आलेली आहे, अशी ही माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

जिल्ह्यात आज अखेर पर्यंत ३८ गावात ४२ टॅंकर सुरू असून टॅंकरची मागणी आल्यानंतर तहसीलदार गटविकास अधिकारी व उपअभियंता पाणीपुरवठा यांच्या अध्यक्षतेखालील समितीने याविषयी तात्काळ निर्णय घेण्याबाबत सूचित करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

जिल्ह्यातील टंचाईच्या पार्श्र्वभूमीवर जिल्हास्तरावर टंचाई उपायोजना राबवण्यासाठी सूक्ष्म नियोजन केलेले असून तालुका स्तरावर ही जिल्हास्तरावरून देण्यात आलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी



यंत्रणांकडून व्यवस्थितपणे केली जात आहे का नाही याची खात्री करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात उपजिल्हाधिकारी महसूल यांनी आढावा घेण्याबाबत सूचित करण्यात आलेले होते व ती कार्यवाही पूर्ण झाल्याची माहिती यांनी दिली.उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर यांनी जिल्ह्यातील टंचाई परिस्थितीची सविस्तर माहिती बैठकीत सादर केली. राज्य शासनाने जिल्ह्यातील बार्शी माळशिरस सांगोला या तीन तालुक्यात गंभीर तर करमाळा व माढा तालुक्यात मध्यम स्वरूपाचा दुष्काळ जाहीर केलेला असून जिल्ह्यातील इतर ५५ महसुली मंडळात ही दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर केलेली आहे. या अनुषंगाने शासनाने दिलेल्या सवलतीची अंमलबजावणी केली जात आहे. तसेच जिल्ह्यातील पाणी साठ्याची सद्यस्थिती उजनी धरणात वजा ३७.०९%, सात मध्यम प्रकल्पात १०.९९%, ५६ लघु प्रकल्पात २.६८% तर ९० कोल्हापूर बंधाऱ्यात १८.६७% पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी दिली.

# दुष्काळ,शेतीमालाचा व दुधाचा कमी दर, हटवण्यासाठी मुस्लिम बांधवांनी केलेली दुॅवा अल्ला कबूल करेल : अभिजीत पाटील

## हुलजंती, तसेच मंगळवेढा शहरात इफ्तार पार्टी आयोजन करण्यात आले



पंढरपूर/प्रतिनिधी :मंगळवेढा तालुक्यातील तालुक्याच्या वाटणीला आलेला दुष्काळ, शेतीमालाचा व दुधाचा कमी दर, हटवण्यासाठी मुस्लिम बांधवांनी केलेली दुॅवा अल्ला कबूल करेल असा विश्र्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार गटाचे नेते तथा श्रीविठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी व्यक्त केला.पंढरपूर मंगळवेढा तालुक्यामध्ये सामाजिक कार्यात अभिजीत पाटील हे नेहमीच अग्रेसर राहिलेले दिसून येतात. सर्वधर्म समभाव हा त्यांच्या कार्याचा स्थायीभाव आहे, हे पुन्हा एकदा त्यांच्या या उपक्रमातून सिद्ध झाले. मंगळवेढा येथील गैबीपीर दर्गा परिसरामध्ये अभिजीत पाटील यांच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मतदार संघ अध्यक्ष मुज्जमील काझी, तालुकाध्यक्ष प्रथमेश पाटील, शहराध्यक्ष चंद्रशेखर कौडूभैरी, संतोष रणदिवे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख प्रा.येताळा भगत, शहराध्यक्ष दत्तात्रय भोसले, पंच गौस मुजावर, मुकद्दर मुजावर, अझर मुजावर, जावेद मुजावर, सादिक मुजावर, जमीर इनामदार, दामाजी माने, रज्जाक शेख, महादेव शिंदे, विठ्ठल कारखान्याचे संचालक सचिन वाघाटे, गणेश ननवरे, बाळासाहेब हाके, उमेश मोरे,धनाजी खरात, यासह मुस्लिम मौलाना व बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष पाटील म्हणाले की, या देशाला पाच हजार वर्षाची परंपरा आहे. गेल्या अनेक वर्षापासून हिंदू-मुस्लिम हे बांधव मोठ्या गुन्यागोविंदाने नांदत असताना त्यामध्ये काही तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला परंतु तो प्रयत्न असफल झाल्यानंतर आता मराठा - ओबीसी असा संघर्ष लावून दिला आहे,भविष्यात गरीब -श्रीमंत असाही संघर्ष लावून देण्याची शक्यता नाकारता येत नाही, पूर्वीच्या काळी दोन समाजातील होणारी मैत्री कौतुकास्पद होती. परंतु अलीकडच्या काळात जात बघून मैत्री करून लागले आणि ती होणारी मैत्री चिंताजनक असून शेतीमालाला दर नाही,माता माऊली सुरक्षित नाही,बेरोजगारी वाढली आहे.देशात सध्या हुकूमशाहीत वाढली आहे त्या विरोधात एकसंघपणे लढण्याची गरज आहे.यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक जमीर इनामदार यांनी केले.

# नरेंद्र मोदीं शिवाय देशाला सक्षम पर्याय नाही

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

पुदुचेरी : काँग्रेस सत्तेत असताना मागील अनेक वर्षांत काँग्रेस ने देशाच्या विकासासाठी ठोस काही केले नाही.सत्तेत असताना काही काम न करता केवळ घोषणा केल्या आणि आता विरोधी पक्ष म्हणून जनतेला भुलविण्याठी केलेल्या घोषणा पत्रात केवळ पोकळ घोषणा केल्या आहेत.पोकळ घोषणा करणाऱ्या काँग्रेस आणि काँगेस च्या इंडिया आघाडीला पराभूत करा असे आवाहन करून देशाचा विकास करताना गावा गावाचा आणि शेवटच्या व्यक्तीचा विचार करणारे प्रधान मंत्री नरेंद्र मोदीच देशासमोर सक्षम पर्याय आहेत. मोदींशिवाय देशासमोर कोणताही सक्षम पर्याय नाही असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी केले.



पुदूचेरी येथील रॉयल पार्क सभागृहात रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्ता बैठकीत ना. रामदास आठवलेंनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.यावेळी पुदुचेरी चे भाजप चे लोकसभा उमेदवार नमो शिवयम यांना रिपब्लिकन पक्षाचा पाठिंबा ना. रामदास आठवलेंनी जाहीर केला.यावेळी रिपाइं चे पुदुचेरी चे प्रदेश अध्यक्ष ज्ञानमुर्ती; रिपाइं चे तामिळनाडू चे प्रदेश अध्यक्ष फादर एम ए सुसाई आदी अनेक मान्यवर उपस्थित होते. केंद्रशासित प्रदेश असलेल्या पुदूचेरीत भाजप आणि रं गास्वामी काँग्रेस पक्षाची युती आहे.या युतीचे पुदुचेरित सरकार असून त्यात रांगास्वामी काँग्रेस चे ५ आणि भाजप चे २ मंत्री आहेत.एकूण ७ मंत्री असलेले पुदूचेरित राज्य सरकार आहे.त्यातील गृहमंत्री असणारे नमो शिवायम हे भाजप चे आमदार असून त्यांनाच भाजप ने लोकसभा निवडणुकीत पुदुचेरीची उमेदवारी दिली आहे.भाजप उमेदवार नमो शीवायम यांना ना. रामदास आठवलेंनी रिपब्लीकन पक्षाचा पाठिंबा जाहीर केला असून त्यांच्या प्रचारासाठी रिपाइं कार्यकर्त्यांची संयुक्त बैठकीला ही ना. आठवलेंनी मार्गदर्शन केले.

मागील १० वर्षांच्या काळात भारत देशाला विविध क्षेत्रात पुढे नेण्याचे काम प्रधानमंत्री मोदींनी केले आहे. चंद्रयान सारखी मोहीम यशस्वी करण्यासाठी शास्त्रज्ञांना प्रोत्साहन देत त्यांच्या पाठीशी सर्व शक्तिनिशी उभे राहणारे प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांनी आपले नेतृत्व सक्षम असल्याचे सिद्ध केले आहे.देश सर्व क्षेत्रात मोदींमुळे पुढे जात असल्याने रिपब्लिकन पक्षाने मोदींच्या नेतृत्वातील भाजप एन डी ए ला पाठींबा दिला आहे.दक्षिण भारतात ही मोदींना जनतेचे समर्थन वाढत आहे. देशभर ८० कोटी गरिबांना मोफत अन्नधान्य सरकार द्वारे वाटप करण्याचा निर्णय घेणाऱ्या मोदींना सर्व समाज घटकांची काळजी आहे. सर्वांना सोबत घेऊन पुढे जाणारे नरेंद्र मोदी हेच या लोकसभा निवडणुकीत देशासमोर प्रधानमंत्री म्हणून सक्षम पर्याय आहेत असे ना. रामदास आठवले म्हणाले. दरम्यान ना. रामदास आठवले यांनी पूदुचेरी दौऱ्यात पुदुचेरी चे मुख्यमंत्री एन रंगास्वामी यांची सदिच्छा भेट घेतली.

# आधार लिंक नाही का.? मग आधारविनाचं शिक्षकांच्या शाळा

## _अतिरिक्त शिक्षकांची प्रमाण वाढण्याची शक्यता..!

सोलापूर/प्रतिनिधी :_सोलापूर जिल्ह्यात एकूण ८ लाख ३० हजार १४१ विद्यार्थी ची संख्या आहे. त्यापैकी ८ लाख ३ हजार ७२० विद्यार्थ्यांचे आधार लिंकिंग झाले आहे . तर अद्याप २० हजार ४३१ विद्यार्थ्यांचे आदर उपलब्ध न झाल्याने लिंकिंग होऊ शकले नाही. राज्यातील इतर जिल्हापेक्षा सोलापूर चं कामकाज संथ गतीने होताना दिसत आहे. परिणाम विद्यार्थ्यांच्या अक्कडेवारी पूर्ण पणे पोर्टल वर अपलोड होईनास झाल आहे .

_शासकिय योजना पासून वंचित राहण्याची शक्यता_

_ शिष्यवृत्ती योजना ,शालेय पोषण आहार अनुदानासह विविध शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांचे आदर लिंकिंग बंधनकारक आहे . विद्यार्थ्यांच्या आधार विना त्यांचा इतर स्पर्ध मार्फत मिळाणारे अनुदान मिळविण्यासाठी अडचणी निर्माण होत आहे.

_संचमान्यता मुळे निवड झालेल्या शिक्षकांना मिळेना नियुक्ती

_ तसेच संचमान्यतासाठीही आत्यावश्यक आहे.सरकाराने अनेकदा आधार लिंकिंग साठी मुदत दिली मात्र त्यानंतरही जिल्ह्यातील २० हजार ४२१ विद्यार्थ्यांचे आधार लिंकिंग झाले नाही

बऱ्याच विद्यार्थ्यांचे जन्म दाखले ही उपलब्ध होत नसल्याने अडचणी येत असल्याचे समजत आहे तसेच त्याबाबत शिबिर घेऊन माहिती द्यायला सांगितली आहे. त्यामुळे २०२३ मध्ये निवड झालेले २६५ शिक्षकांची सुद्धा पदोन्नीती व अतिरिक्त मुळे अडचण उद्भवत आहे. त्यामुळे त्यांचा फटका नवीन शिक्षकांना बसू शकेल.

_नवीन शैक्षणिक वर्ष च्या तोंडवर आधार अपडेड नाही.

आधार कार्ड अपडेट करण्यासाठी गेल्या काही वेळा मुदतवाढ देण्यात आली टायपिंगच्या चुकीमुळे विद्यार्थ्यांच्या जन्मतारीख नावात बदल आणि विद्यार्थ्यांच्या स्थलांतरामुळे अडचणी निर्माण होत आहेत. त्या सर्व गोष्टीची गांभीर्याने दखल घेऊन येत्या काही दिवसात सर्व आधार कार्ड अपडेट केले गेले पाहिजे नाहीतर येत्या नवीन शैक्षणिक वर्षात अनेक शिक्षक अतिरिक्त होण्याची दाट शक्यता उद्भवत आहे आणि त्यामुळे शाळेच्या अनुदानावरही प्रणाम होऊ शकतो .

_ आधारांच्या अडचणी मुळे आरटीई प्रवेश प्रक्रिया रखडणार

_ जिल्ह्यात प्राथमिक, माध्यमिक व खाजगी माध्यमिक व प्राथमिक (शहरी, ग्रामीण आणि नागरी) अशा जवळपास २ हजार ६४९ आहेत.मागील दिड वर्षापासून आरटीई ची ५०३ प्रकरणी प्रलंबित होती.त्यात नूतनीकरणासह अनेक बाबींचा समावेश होता. तसेच आता नवीन धोरणामुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळा व खासगी नामांकित शाळेत प्रवेश घेऊ इच्छिणारे विद्यार्थी ची सुद्धा मोठ्या प्रमाणात हेळसांड होण्याची दाट शक्यता आहे.

### स्पर्धा परीक्षा समन्वय समिति शिक्षक भरती संघटना..!

_ विद्यार्थ्याच्या आधार कार्ड अपडेट झाले नाही तर प्रणालीवर नोंदणी होत नाही. त्यामुळे विद्यार्थांचा इयत्ता व पटसंख्खा कळत नाही. व दहावी, बारावी तसेच शिष्यवृत्ती परीक्षा वेळीसुद्धा अडचण निर्माण होईल. त्यामुळे पटसंख्या कमी दिसते. याचा परिणाम शाळेच्या अनुदानावर तसेच सेवक संचवर होतो. आधार अपडेड लवकर करून पदोन्नती देण्यात यावी. व नवनियुक्त शिक्षकांना शाळा उपलब्ध करून द्यावी. **प्रशांत शिरगुर समन्वयक प्रवक्ता.**

# प्रणिती शिंदे यांना निवडून आणण्यासाठी काँग्रेसच्या सर्व सेलच्या पदाधिकाऱ्यांनी कामाला लागा :अॅड.पवार



सोलापूर/प्रतिनिधीः गेल्या दहा वर्षांमध्ये सोलापूर विकास कामांमध्ये खूप मागे राहिलेले आहे. भाजपा सरकारने फक्त आश्र्वासने दिली जनतेची फसवणूक केली. युवकांना रोजगार नाही, महिलावरील अत्याचार वाढले, महागाई वाढली, गॅस सिलेंडरचे भाव वाढले, पेट्रोल डिझेलचे भाव वाढले, शेतकऱ्याच्या मालाला हमीभाव नाही,अच्छे दिन येणार म्हणाले होते पण अच्छे दिन आले नाहीत. आशी फसवी आश्र्वासने देणाऱ्या भाजपाला सत्तेपासून रोखाण्यासाठी व सोलापूरच्या विकासासाठी लोकांच्या घराघरापर्यंत जाऊन काम करणाऱ्या व लोकांच्या व्यथा ऐकून घेऊन त्या मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या नेत्या प्रणितीतिई शिंदे यांना जास्तीत जास्त मताधिक्य देऊन निवडून आणण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आवहान सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष नंदकुमार पवार यांनी केले.

सोलापूर जिल्हा काँग्रेस विभाग व सेलचे जिल्हाध्यक्ष, पदाधिकारी, तालुका अध्यक्ष यांची बैठक काँग्रेस भवन सोलापूर येथे संपन्न झाली.

याप्रसंगी व्यासपीठावर महिला काँग्रेसच्या अध्यक्षा शाहिनताई शेख, जिल्हा उपाध्यक्ष अशोक देवकते, राजेश पवार ,बाळासाहेब डुबे-पाटील, वरिष्ठ उपाध्यक्ष सिंकंदरताज पाटील, सुनील नागणे, कविताताई कदम, बजरंग बागल, कांतीलाल राऊत, सुरेश हावळे, गजेंद्र खरात, गिरीश शेटे, राजेंद्र रुपनवर, संग्राम जाधव, भीमराव बंडगर, लक्ष्मण भोसले,नितिन आयवळे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी विभाग व सेलचे अध्यक्ष राजेंद्र रुपनवर, शाहीनताई शेख, गजेंद्र खरात,सुनंजय पवार,राजेश पवार, अशोक देवकते, वसिमभाई पठाण, लक्ष्मण भोसले, कविताताई कदम, सुदर्शन आवताडे, रमजान नदाफ, संग्राम जाधव,सुरेश हावळे, सुनील नागणे, अशोक पाटोळे, उमाशंकर रावत, बाळासाहेब दुबे -पाटील, बजरंग बागल, किशोर पवार, जयश्री कवचाळे, अरुणा बेजारपे, राशीद शेख, बजरंग बागल, अंकुश आतकर, रमेश नामदास, निवेदिता आरगडे, आदींनी मनोगत व्यक्त केले.या बैठकीस वरिष्ठ उपाध्यक्ष सिकंदरताज पाटील, कांतीलाल राऊत, अल्लादीन शेख, अशोक चोपडे, गिरीश शेटे, महंमद शेख, अप्पू शेख,मुन्ना हरणमारे, सुहास भाळवणकर, नागनाथ कदम, पंडित लांडगे सर, मुमताज शेख, फरजाना शेख, भीमराव बंडगर, प्रकाश नगरे, गणेश माने, नागनाथ आढळराव, मुन्ना कुडले, पंडित लांडगे शंकर धोत्रे मिलिंद आढळकर,बशिर पिरजादे,रवींद्र शिवशरण, पांडुरंग भुई, विद्या कोळकुर, आयेशा शेख, सुनीता हडलगी, भीमराव बंडगर, नाथा आयवळे,अजिंक्य गायकवाड, हाजी बिलाल शेख आदी उपस्थित होते.

# सत्तेसाठी भाजपचे लोक रेटून खोटे बोलतात प्रणिती शिंदेचा घनाघात



पंढरपूर/प्रतिनिधीः भाजपने गेल्या दहा वर्षात जनतेला दिलेली आश्र्वासने पूर्ण न करता विश्र्वाघात केला आहे हे लोक सत्तेसाठी प्रचंड खोटे बोलतात त्यांचा परिणामी आज सर्वसामान्य जनतेला भाव लागत असल्याची टीका सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे महागाईसा गाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांनी केली आहे पण ती शिंदे या शनिवारी मंगळवेढा तालुक्यात दौऱ्यावर आल्या होत्या या दौऱ्यात त्यांनी भाजप सरकारवर सरकून टीका केली

पंडित शिंदे म्हणाल्या २०१४ ते २०१९ काळात भाजपने काहीच काम केले नाही तरी २०१९ ला ते आपल्याला मते मागायला आले यावेळी देखील आपण विश्र्वासाने त्यांना निवडून दिले मात्र त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळातही त्यांनी फसव्या आश्र्वासनाशिवाय काहीच काम केले नाही हीच वस्तू तिथे सांगायला आम्ही आलो आहेत यावेळी भाजपच्या फसवणुकीला बळी पडू नका आणि महाविकास आघाडीला मतदान करा असे आव्हान प्रणिती शिंदे यांनी केले प्रणिती शिंदे यांनी पाणी प्रश्र्न महागाई बेरोजगारी जीएसटी या विषयावर देखील भाजप सरकारला धारेवर धरले

मोदी सरकारच्या काळात सर्वात जास्त हाल शेतकऱ्यांची झाली आहे दुधाला दर नाही कांद्याला दर नाही कांद्याला निर्यात बंदी लागू केली सध्या स्थितीत पाणीटंचाई हा प्रश्र्न बसवून उभा केला हे वीज पुरवठा सुरळीत नाही खताचे दर वाढलेले आहेत महागाई उच्चांक गाठला आहे म्हणजेच या सरकारने केवळ आश्र्वासने देऊन जनतेची फसवणूक केली असल्याची टीका प्रणिती शिंदे यांनी केली.प्रणिती यांनी आज गाव भेट दौऱ्यावर खोमनाळ पाटेवाडी तळसंगी भालेवाडी डोनर नंदुर आरडी राठेवाडी कामतरडी धानोर बोराडे सिद्धापूर माचनूर ब्रह्मपुरी या गावाला भेटी दिल्या यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष आणि नंदकुमार पवार अँड शिवाजीराव काळुंखे शिवसेना जिल्हा उपप्रमुख तुकाराम भोजने महिला तालुका अध्यक्ष प्रमुख नंदा ओमनी महिला आघाडीच्या जिल्हा उपप्रमुख क्रांती दत्तू अँड अर्जुन पाटील प्रशांत साळे विष्णु शिंदे शिवशंकर कवचाळे अँड रविकिरण कोळेकर अजय आधाटे मनोज माळी बापू अवघडे सुनीता अवघडे नाचाएवळे अमोल मामले जयश्री कौचाळे संतोष पाटील शिवाजी काळे संजीव कौसाळे साहेबांचे चेतन पाटील सांगना घोडके कुमार धनवे संदीप बाबर पंडित पाटील प्रशांत सगेलकर सचिन नकाते महेश जोकरे आयुष्याचे कधी उपस्थित कार्यकर्ते मोठ्या संख्येने नागरिक ही उपस्थित होते

# मुद्रीत माध्यमाच्या जाहिरातीचे पूर्व प्रमाणीकरण आवश्यक

### मतदानापूर्वीचा एक दिवस व मतदानाच्या दिवशीची राजकीय जाहिरात; २ दिवस आधी अर्ज सादर करावा

चंद्रपूर : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण करण्यासाठी १३-चंद्रपूर लोकसभा मतदार संघाकरीता जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या अध्यक्षतेखाली माध्यम पूर्व प्रमाणिकरण आणि सनियंत्रण समिती (एम.सी.एम.सी.) स्थापन करण्यात आली. मतदानापुर्वीचा एक दिवस (१८ एप्रिल) आणि मतदानाच्या दिवशी (१९ एप्रिल) मुद्रीत माध्यमाद्वारे (प्रिंट मिडीया) प्रकाशित करावयाच्या राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. अशा जाहिरातींबाबतचे अर्ज, जाहिरात प्रकाशित करण्याच्या प्रस्तावित तारखेच्या दोन दिवसापूर्वी समितीकडे सादर करावे, अशा सुचना जिल्हा निवडणूक अधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिल्या आहेत.

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक पहिल्या टप्प्यात म्हणजे १९ एप्रिल २०२४ रोजी होत आहे. मतदानाच्या दिवशी व मतदानाच्या एक दिवसापूर्वी प्रिंट मिडीयातून कोणत्याही भडकाऊ, दिशाभुल करणा-या किंवा द्वेषपूर्ण जाहिरातींमुळे कोणतीही अप्रिय घटना घडू नये, ज्यामुळे निवडणूक प्रक्रियेला खीळ बसेल, अशा जाहिराती प्रकाशित होऊ नये, याबाबत दक्षता घेण्याचे निर्देश भारत निवडणूक आयोगाने दिले आहे. कोणताही राजकीय पक्ष किंवा उमेदवार किंवा इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांनी मतदानाच्या दिवशी आणि मतदानाच्या एक दिवस आधी प्रिंट मिडीयामध्ये कोणतीही राजकीय जाहिरात, जोपर्यंत राज्य / जिल्हा स्तरावरील माध्यम पूर्व प्रमाणीकरण समितीकडून (एमसीएमसी) पूर्व प्रमाणीत केली जात नाही, तोपर्यंत वृत्तपत्रात प्रकाशित करू नये. मतदानाच्या दिवशी आणि मतदानाच्या एक दिवस आधी प्रिंट मिडीयामध्ये राजकीय जाहिरात द्यायची झाल्यास अर्जदारांना सदर जाहिरात प्रकाशित करण्याच्या प्रस्तावित तारखेच्या दोन दिवस आधी समितीकडे अर्ज सादर करावा लागेल. भारत निवडणूक आयोगाच्या वरील निर्देशाचे काटेकोरपणे पालन व्हावे, असे अवर सचिव व उपमुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी कळविले आहे.